# कृषि औजारे चाचणी व प्रशिक्षण केंद्र
## कृषि यंत्र व शक्ती विभाग
## कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय
## वनामकृवि, परभणी

दुरध्वनी : ०२४५२-२२३२३० ईमेल : adpcaetpbn@rediffmail.com


जा.क्र. आरकेव्हीवाय/कृऔचाप्रके/ ५४ /२०२०
दि. २१ /०१ /२०२०

**जाहीरात**

कृषि औजारे चाचणी व प्रशिक्षण केंद्र, कृषि यंत्र व शक्ती विभाग, कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी येथे खालील तात्पुरत्या/कंत्राटी स्वरुपातील पदांसाठी सोबत दिलेल्या अर्जाच्या नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेद्वाराने आपले अर्ज प्रमुख अन्वेषक, कृषि औजारे चाचणी व प्रशिक्षण केंद्र, कृषि यंत्र व शक्ती विभाग, कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी यांच्या नावे दि. ०४/०२/२०२० पर्यंत करण्यात यावेत.

तात्पुरत्या/कंत्राटी स्वरुपातील भरावयाच्या पदाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | प्रस्तावित पदसंख्या | एकत्रित वेतन प्रति महा (रु.) | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | तांत्रिक सहाय्यक | १ | २५,०००/- | १) एम.टेक. (कृषि यंत्र व शक्ती अभि.), कॅड कॅम ज्ञान आवश्यक आहे. आणि ०१ वर्ष अनुभव<br>२) कृषि यंत्र व औजारे चाचणी संबंधीत अनुभव असल्यास प्राधान्य |
| २ | कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक | १ | १८,०००/- | १) बी.टेक. (कृषि अभि.), कॅड कॅम ज्ञान आवश्यक आणि ०१ वर्ष अनुभव<br>२) कृषि यंत्र व औजारे चाचणी संबंधीत अनुभव असल्यास प्राधान्य |
| ३ | डिझेल मेकॅनिक | १ | १२,०००/- | १) आयटीआय डिझेल मेकॅनिक ट्रेड<br>२) ट्रॅक्टर ड्रायव्हींग परवाना असल्यास प्राधान्य |
| ४ | ट्रॅक्टर ड्राइव्हर | १ | १२,००० | १) दहावी पास व ट्रॅक्टर आणि वाहन चालक परवाना आवश्यक |
| ५ | संगणक चालक/कार्यालयीन मदतनीस | १ | १०,००० | १) पदवीधर, संगणक परिक्षा एमएससीआयटी किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण व इंग्रजी- ४० आणि मराठी -३० टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण<br>२) संणकासंबंधीत संपूर्ण ज्ञान असणे आवश्यक<br>३) अनुभवी उमेद्वारास प्राधान्य |
| ६ | सहाय्यक मदतनीस | २ | ९,०००/- | १) बारावी उत्तीर्ण उपकरणावरील इंग्रजी वाचता येणे आवश्यक<br>२) औजारे व यंत्रे जोडणीचे प्रात्यक्षिक ज्ञान आवश्यक<br>३) इंग्रजीचे ज्ञान आवश्यक |

**मुलाखती : -** सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, कृअवतंम, वनामकृवि, परभणी यांच्या कार्यालयात मुळ कागदपत्र ची पडताळणी केल्यानंतर घेण्यात येतील.

**नियम व अटी :**

१. वय मर्यादा : - खुल्या प्रवर्गातील उमेद्‌वाराचे वय दि. ०४/०२/२०२० पर्यंत ३८ वर्षापेक्षा जास्त असू नये. (अ.जा./अ.ज. आणि इतर मागासवर्गीय यांना नियमानुसार वयमर्यादेमध्ये शिथीलता देण्यात येईल.)
२. अर्ज पाठविण्याच्या लिफाप्यावर कृषि औजारे चाचणी व प्रशिक्षण केंद्रातील (पदाचे नाव) ------------------ पदासाठी अर्ज असे नमुद करावे.
३. मुलाखतीच्या वेळी अर्जासोबत जोडलेल्या सर्व प्रमाणपत्राच्या मुळ प्रती सादर करणे बंधनकारक असेल.
४. मुलाखतीच्या वेळी उपस्थितीत राहणा-या उमेद्‌वारांना कोणत्याही प्रकारचा दैनिक अथवा प्रवास भत्ता अनुज्ञेय असणार नाही.
५. निवड समितीद्वारे फक्त पात्र उमेद्‌वाराच्या मुलाखती घेण्यात येतील.
६. उमेद्‌वाराची निवड ४ महिने किंवा प्रकल्प कालावधी यामध्ये जो कालावधी कमी असेल त्या कालावधीसाठी असेल.
७. निवड झालेल्या उमेद्‌वारास त्या कालावधीमध्ये हया योजनेत दिलेले काम पूर्ण करेल व मध्यंतरी काम सोडून जाणार नाही असे रु. १००/- च्या बंधपत्रावर हमीपत्र लिहून देणे आवश्यक आहे.
८. तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक दिलेल्या उमेद्वारास वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी नौकरी मिळण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.
९. उमेद्‌वाराला नेमणुकीच्या पदाची नोकरी सोडायची असल्यास त्यास १ महिना पुर्वी या कार्यालयास अर्जाद्वारे कळविणे बंधनकारक असेल. अन्यथा एक महिन्याचे वेतन या कार्यालयात जमा करावे लागेल.
१०. एक किंवा संपुर्ण अर्ज व निवड प्रक्रिया कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे हक्क निवड/छाननी समितीकडे राखून ठेवत आहेत.
११. निवड झालेल्या उमेद्‌वास विद्यापीठ कार्यक्षेत्रामध्ये अथवा योजनेच्या उद्दिष्ठानुसार इतर ठिकाणी काम करणे बंधनकारक असेल.
१२. नेमणुक तसेच वेतनासंबंधी सर्व दावे योजनेचा कार्यकाळ संपल्यानंतर आपोआप संपुष्ठात येतील.
१३. जाहिरातीत नमुद केलेल्या एकत्रित वेतनात विद्यापीठ निर्णयानुसार बदल होवू शकतो.
१४. उमेद्‌वार सध्या इतर ठिकाणी कार्यरत असल्यास त्यांना संबंधीत कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
१५. जाहिरातीतील पदावर निवड होण्यासाठी उमेद्‌वाराकडुन कोणत्याही प्रकारचा दबाव किंवा गैरवर्तणुक आढळल्यास उमेद्‌वाराला निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.
१६. जाहिराती संबंधीत प्रक्रियेमध्ये टपाल खात्याच्या दिरंगाईस विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.
१७. जाहिरातीत दर्शविलेली विविध पदांची संख्या आवश्यकतेनुसार कमी किंवा जास्त करण्याचे अधिकार निवड समितीस असेल.
१८. उमेद्‌वार संबंधीत पदाची किमान पात्रता पुर्ण करीत आहे म्हणून उमेद्‌वाराची निवड करणे समितीस बंधनकारक असणार नाही.
१९. जाहिरातीत दर्शविलेल्या विविध पदांसाठी प्राप्त अर्जांची संख्या जास्त असल्यास गुणवत्तेच्या आधारावर छाननी करुन पात्रता यादी तयार करण्यात येईल. तसेच पद क्र. ४ व ५ करीता प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात येईल. सदरील परिक्षेची दिनांक व वेळ पात्र उमेद्‌वारास कळविण्यात येईल.
या जाहीराती संबंधीची सर्व माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर दर्शविण्यात येईल.

**प्रमुख अन्वेषक**
**कृषि औजारे चाचणी व प्रशिक्षण केंद्र**
**कृषि यंत्र व शक्ती विभाग**
**परभणी**

# अर्जाचा नमुना

Photo

१. अर्ज केलेल्या पदाचे नांव :-

२. उमेद्वाराचे संपूर्ण नाव :-

३. वडिलांचे /पतीचे नाव :-

४. जन्मतारीख (अंक व अक्षरासाठी) :-

५. लिंग :-

६. वय :-

७. दुरध्वनी क्रमांक /भ्रमनध्वनी क्र. :-

८. सध्याचा पत्रव्यवहारासाठी पत्ता :-

९. कायम पत्ता :-

१०. मागासवर्गीय असल्यास जात/प्रवर्ग :-अ.जा./वि.जा/भ.ज./इ.मा.व./वि.मा.प्र. :-

११. शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्र. | उत्तीर्ण परिक्षेचे नाव | बोर्ड/विद्यापीठ संस्थेचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | वर्ग/श्रेणी | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

१२. अनुभव :-

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेले पद व वेतनश्रेणी | दिनांक (पासून) | दिनांक (पर्यंत) | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

१३. प्रकाशने, पुर्ण केलेले प्रशिक्षणे (पद अ.क्र. १ व २ साठी) पुराव्यासह

१४. उपरोक्त पदासाठी अन्य काही विशेष प्राविण्य अवगत असल्यास त्याबाबतची सविस्तर माहिती

## प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो/करते की, मी अर्जामध्ये नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे पुर्णतः सत्य व बरोबर आहे. मी असेही प्रमाणित करतो की, १) मला कोणत्याही सरकारी, स्वायत्त संस्था, भाकृअप, नवी दिल्ली अंतर्गत सेवा इ. मध्ये कोणत्याही प्रकारची शिक्षा झालेली नाही अथवा कामावरुन काढून टाकलेले नाही. २) मला कोणत्याही न्यायालयाने कुठल्याही प्रकारची कायदेशीर शिक्षा केलेली नाही. मी असेही प्रमाणित करतो/करते की, मी वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास त्या माहिती आधारे मिळवलेली नोकरी गमावण्यास बांधील राहीन व त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**(अर्जदाराचे संपुर्ण नाव व सही)**